भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ७५७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ११/११/२०१७

१) अल्पवयीन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक ९/११/२०१७ चे ०७.०० वाजता. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले सायकलने टिवुशन करीता गावाकडे जात असता यातील आरोपीने फिर्यादीचे सायकल अडवुन तीचे केस पकडुन तिला केस पकडुन तीला सायकलवरुन रोडवर खाली पाडुन तीचा विनयभंग केल्याने अशा फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(अ)(१) भा.दं.वी. सहकलम बा. लै. अ. प्र. कायदा २०१२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निबेंकर पो.स्टे. साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

२) संगनमत करुन रोडच्या कामासाठी अंदाज पत्रक तयार करुन शासनाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद .:–

दिनांक १६/०१/२०१४ ते २७/०३/२०१४ यातील आरोपी क्र. १ ते ८ यांनी संगनमत करुन ग्रा. रो. ह. अंतर्गत सिमेंट रोडच्या कामाकरीता मंजुर नियोजनात नसतांना देखील त्या बांधकामाचे अंदाज पत्रक तयार करुन निधी मंजुर करुन पुन्हा त्याच सिमेंट रोडचे अंदाज पत्रक तयार करुन रस्त्याचे बांधकाम न करता निधी मंजुर केले एकाच रोडच्या कामासाठी २ वेळा अंदाज पत्रक तयार करुन खोटे मजकुर दाखवुन मोजमाप पुस्तकात नोंदी घेवुन ठरावात खाडाखोड करुन शासनाचे २,९४,१०८/–रु. निधीची अफरातफर केल्याने फिर्यादी सौ. रुपा मोघा दिघे वय ५२ वर्ष, रा. सिव्हील लाईन भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४२०,४०९,४६८,४७१,३४ भा.दं.वी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.नि. कंकाळे पो.स्टे. तुमसर हे करीत आहेत.

३) संगनमत करुन महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–

दिनांक १०/११/२०१७ चे १९.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरी एकटीच हजर असतांना यातील आरोपी क्र. १ हा त्याचे २ ते ३ मित्रासह फिर्यादीचे घरा समोर आला व आरोपी क्र १ ने फिर्यादीला पिण्याचे पाणी मागण्याचे उद्येशाने घरात प्रवेश केला व फिर्यादीने पिण्याच्या पाण्याचा ग्लास दिला असता त्याने तीचा हात पकडुन तीचे सोबत जबरदस्ती करीत असता फिर्यादीने त्यास आरडाओरडा करीन? असे बोलल्यावर तो त्याचे घराबाहेर असलेल्या मित्रा सोबत पळुन गेला व काही वेळाने आरोपी क्र. १ ने फिर्यादीचे घरात ऊडी घेवुन प्रवेश केला त्यामुळे फिर्यादी ही घरा बाहेर पडुन जात असतांना त्याने तीला जबरदस्तीने पकडुन जबरदस्ती करुन विनयभंग केल्याने पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम ४५२,३५४(अ)(१)(ब),३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. इंगळे पो.स्टे. आंधळगाव हे करीत आहेत.

**४) ट्रकच्या धडकेत एकाचा इसमाचा मृत्यु व दुसरा इसमास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद .**

दिनांक १०/११/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रक रॉग साईडने भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन समोरुन येणाऱ्या मोटार सायकल क्रमांक क्र. एम एच ३६ डी १९०४ ला खरबी येथे धडक मारुन श्रीहरी उदाराम बावणकुळे वय ४५ वर्ष, रा. मकरधोकडा याचे मरणास व दुर्योधन डोमास डहारे वय ४५ वर्ष, रा. मानेगाव मेंढा याला जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादीचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २७९,३३८,३०४(अ) भादवी. सहकलम २ आर. आर. आर १७४,१७७,१३४(ब)मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास स.पो.नी नेवारे हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**५) संगनमत करुन गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. तहसिलदार यांचे उल्लघंन केल्याने गुन्हा नोंद .**

दिनांक १०/११/२०१७ चे १४.०० ते १५.०० वा. दरम्यान यातील आरोपीतांनी संगनमत करुन गैरकायदयाची मंडळी जमवुन मा. तहसिलदार तुमसर यांनी दिलेल्या परवानगीचे उल्लघंन करुन राज्य महामार्ग क्र. २७१ वर जाणाऱ्या येणाऱ्या वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याने पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम ३४१,१४३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उ.प.नी जाधव हे करीत आहेत.

**६) मोटार सायकलची चोरी : — .**

**अ)** दिनांक ०९/११/२०१७ चे २१.०० ते २२.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले आजीला पाहण्यास व डब्बा पोहचविण्यास झवर दवाखाना येथे गेले असता दवाखाण्याच्या आवारात ठेवलेली फिर्यादीची लाल काळया रंगाची हिरो होडा पॅशन प्रो मोटार सायकल क्र. एमएच ३६ पी १७१९ किंमती ३०,०००/—रु. ची कोणीतरी अज्ञात चोराने सुना मौका पाहुण चोरुन नेल्याने अशा फिर्यादी अतुल तुकाराम जिभकाटे वय २९ वर्ष, रा. वेलतुर ता. कुही जि. नागपुर यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उ.प.नी. थेर हे करीत आहेत.

**ब)** दिनांक ०९/११/२०१७ चे २१.०० ते १०/११/२०१७ चे १४.४५ वा. दरम्यान यातील फिर्यादी अमोल कृष्णा पिकलमुंडे वय २७ वर्ष, पानमारा ता. मौदा जि. नागपुर याने त्याची पल्सर काळया रंगाची १५० सिसी क्र. एमएच ४० एमव्ही ४६९३ किंमती २२,०००/—रु. ची प्रयास हॉस्पीटल समोर उभी करुन उपचारा करीता आत गेला व उपचार करुन परत आला असता ठेवलेल्या ठिकाणी गाडी दिसुन आली नाही मोटार सायकल कुणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने अशा फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उ.प.नी बोरकर हे करीत आहेत.

७) नाल्याच्या पाण्यात इसम मृत अवस्थेत मिळुन आल्याने मर्ग नोंद ..:–

दिनांक ७/११/२०१७ चे १०.०० ते १०/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान यातील मृतक उत्तम श्रीराम खंगार वय ३९ वर्ष, रा. मानेगाव हा दिनांक ०७/११/२०१७ चे सकाळी १०.०० वाजता दरम्यान घरी कोणाला काही न सांगता घरुन निघुन गेला होता तो आज दिनांक १०/११/२०१७ चे १५.०० वाजता दरम्यान मानेगाव बाजार शिवारातील नाल्यात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी ताराचंद दशरथ भुरे वय ५० वर्ष, रा. मानेगाव बाजार यांचे तोंडी रिपेर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जा.फौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पो.हवा. बहादुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

८) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

अ) दिनांक १०/११/२०१७ चे १७.३० ते १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत रेल्वे स्टेशन वरठी येथे ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.उ.प.नि. राऊत पो.स्टे. वरठी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उ.प.नि. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

ब) दिनांक १०/११/२०१७ चे १८.२० ते १८.५० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत रेल्वे स्टेशन वरठी येथे ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पो.उ.प.नि. राऊत पो.स्टे. वरठी यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पो.उ.प.नि. राऊत पो.स्टे. वरठी हे करीत आहेत.

९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–

दिनांक १०/११/२०१७ चे १७.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन आमरोडवर येणा–या जाणा–या वाहुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत पालांदुर येथे ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोहवा. राऊत पो.स्टे. पालांदुर यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. शेंडे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

१०) अवैध दारू अड्डयांवर धाडी . :—

दिनांक १०/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, कारधा, गोबरवाही व पवनी येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन २४ लिटर हातभट्टी दारू किंमती १,८००/—रूपया चा माल तसेच ५ लिटर ७६० मि.ली. देशी/विदेशी दारू किंमत २,३५३/— रुपयाचा माल तसेच जुगारातुन किंमती ५०३/—रु. असा एकुण ४,६५६/— रुपया चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—

दिनांक १०/११/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ११७ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवाशी ०१ तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व ईतर वाहनांवरती १११ केसेस करण्यात आलेले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.